N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धाराशिव **P.S.(ठाणे):** तुळजापूर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0033 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**29/01/2025 22:21

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 29/01/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 29/01/2025
**Time From (वेळेपासून):** 13:12 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 29/01/2025 **Time (वेळ):** 22:21 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 032
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/01/2025 22:21 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** तालुका कषी अधिकारी कार्यालय, तुळजापुर,तुळजापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

42

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** विलास बाबुराव कोळी मगतराव
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1960
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | बारूळ ,तुळजापूर,तुळजापूर,धाराशिव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | बारूळ ,तुळजापूर,तुळजापूर,धाराशिव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9637999719

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अतुल शहाजी देशमुख | | | 1. मराठी कन्या शाळेजवळ शिक्षक , कॉलनी धाराशिव,धाराशिव, तुळजापूर,धाराशिव,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच रक्कमेची मागणी करुन | 300.00 |



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | 300/ रुपये लाच रक्कम स्विकारली. | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

300.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 29.01.2025

मी विलास बाबुराव कोळी (मगतराव), वय 65 वर्ष, व्यवसाय- शेती रा. बारुळ ता.तुळजापूर जि.धाराशिव मोबाईल नंबर 9637999719.

आज दिनांक 29.01.2025 रोजी तुळजापूर येथे सुरक्षित ठिकाणी हजर राहुन तक्रार दिली, त्यामधील हकिगत अशी की, "मी वरील ठिकाणी माझे कुटंुबासह राहतो, शेती व्यवसाय करून उपजिवीका भागवीतो.
मौजे बारुळ शिवारात शेत गट नंबर 175 मध्ये माझी 1 हे. 60 आर. शेत जमीन असून ती माझी मुले अभिषेक व ओम यांचे नावावर केलेली आहे. सन-2023 मध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत मौजे बारुळ शिवारात मुलांचे नावावर असलेल्या शेत गट नंबर 175 मध्ये तुती रेशीम लागवडीचा प्रस्ताव मुलगा अभिषेक याचे नावाने तालुका कृषी अधिकारी कार्यालय, तुळजापूर जि.धाराशिव येथे दाखल केला होता. त्यास दिनांक 06.08.2024 रोजी 4,18,815/- रुपयाची प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदर शेतामध्ये आम्ही तुती रेशीमची लागवड करुन आत्तापर्यंत त्याचे पाच मस्टर भरुन तालुका कृषी अधिकारी कार्यालय, तुळजापूर जि. धाराशिव येथे दाखल केलेले असुन त्यापैकी चार मस्टरचे 27,621/- रुपयाचे बील मंजुर झालेले आहे. परंतु सदरची रक्कम आजपर्यंत आम्हाला मिळालेली नाही. आजपर्यंत दाखल केलेल्या प्रत्येक मस्टरला तालुका कृषी अधिकारी कार्यालय, तुळजापूर जि.धाराशिव येथील देशमुख साहेब यांनी माझ्याकडुन 300/- रुपये घेतलेले आहेत. त्यावेळी मला सदरची रक्कम ही शासकीय फी असावी असे वाटत होते. परंतु नंतर मला समजले की देशमुख साहेब हे माझ्याकडुन लाच घेत आहेत. माझे मुलाचे नावावरील शेतातील तुती रेशीम लागवडीचे मागील आठवडयाचे नमुना क्रमांक 4 वरुन ऑनलाईन ई मस्टर काढुन नंतर ते भरणे बाकी आहे. त्यासाठी देशमुख साहेब हे माझेकडुन 300/- रुपये लाच घेतल्याशिवाय ते काम करणार नाहीत, अशी माझी खात्री झालेली आहे. मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही.
आज रोजी मी नमुना क्रमांक 4 घेवुन तालुका कृषी अधिकारी कार्यालय, तुळजापूर जि.धाराशिव येथे जावुन देशमुख साहेब यांची भेट घेवुन त्यांना माझ्या कामासंबंधाने बोलणार आहे. तेंव्हा त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी." वगैरे मजकुरची तक्रार म्हेत्रे साहेब, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, धाराशिव यांच्याकडे दिली व त्यांनी माझी तक्रार पोेकॉ/शेरकर यांना प्रतिवेदीत केली. त्यावरुन पोेकॉ/शेरकर यांनी माझी तक्रार लॅपटॉपवर टाईप करुन त्याची प्रिन्ट काढली. त्यानंतर त्यांनी माझी लॅपटॉपवर टाईप केलेली तक्रार व मी तोंडी सांगितलेली तक्रार एकच असल्याची खात्री झाल्यानंतर मी, त्यांनी व उपस्थित पंचांनी त्यावर सहया केल्या. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक म्हेत्रे साहेब यांनी मला कळविले की, माझ्या तक्रारीचे अनुषंगाने देशमुख साहेब, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, तुळजापूर जि.धाराशिव यांची लाचेची मागणी आहे किंवा कसे? याबाबत त्यांची पंचासमक्ष तालुका कृषी अधिकारी कार्यालय, तुळजापूर जि.धाराशिव येथे लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याबाबत खुलासा करुन लाचमागणी पडताळणी दरम्यान त्यांची लाचेची मागणी सिध्द झाल्यास लाचेचा सापळा आयोजीत करण्यात येईल असे सांगितले. तसेच त्यांनी दोन्ही पंचांची पंच म्हणुन काम करण्याची सहमती घेवुन गुरूनाथ रामकृष्ण बिरादार, भुमापक, उप अधीक्षक, भूमी अभिलेक कार्यालय, धाराशिवयांची पंच क्रमांक 1 म्हणुन तर माणिक काशीनाथ पांचाळ, शिपाई, उप अधीक्षक, भूमी अभिलेक कार्यालय, धाराशिव यांची पंच



Scanned with OKEN Scanner

क्रमांक 2 म्हणुन नेमणुक केली. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला कळविले की, लाचमागणी पडताळणी दरम्यान व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार आहे. त्यानंतर त्यांनी पोना/शेवाळे यांना दिलेल्या सुचनेप्रमाणे पोना/शेवाळे यांनी सोबत आणलेल्या एका काळ्या रंगाच्या बॅगमधुन व्हाईस रेकॉर्डर बाहेर काढुन त्याबाबत मला व दोन्ही पंचांना सविस्तर माहिती देऊन त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखविले व एक नवीन मेमरी कार्ड व्हॉइस रेकॉर्डरमध्ये टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण रेकॉर्ड नसलेबाबत खात्री करुन दिली. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी माझे तसेच देशमुख साहेब यांचेत होणारे संभाषण हे व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्ड मध्ये रेकॉर्ड होणार असलेबाबत सांगितले.त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला देशमुख साहेब यांची भेट कोठे होईल ? याबाबत विचारले असता मी त्यांना देशमुख साहेब हे तालुका कृषी अधिकारी कार्यालय, तुळजापूर जि.धाराशिव येथेच असून, तेथेच त्यांची भेट होईल असे सांगीतले. तेंव्हा म्हेत्रे साहेब यांनी लाचमागणी पडताळणीच्या अनुषंगाने मला सुचना दिली की, मी देशमुख साहेब यांची तालुका कृषी अधिकारी कार्यालय, तुळजापूर जि.धाराशिव येथे पंचासह जावून त्यांची भेट घेवुन त्यांना आपले कामासंबधाने बोलावे, दरम्यान त्यांनी लाचेची मागणी केल्यास त्यांचेकडुन वेळ मागुन घेवुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत यावे. तसेच त्यांनी पंचांनाही सापळा कार्यवाहीच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर त्यांनी पोना/शेवाळे यांना दिलेल्या सुचनेप्रमाणे त्यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझे अंगावरील शर्टचे आतमध्ये असलेल्या बनियनला पिनने लावुन मला व पंच क्रं.1 बिरादार यांना माझेकडील मोटार सायकल क्रमांक MH 03 P 4638 वर सापळा पथक थांबलेल्या ठिकाणावरुन देशमुख साहेब यांची भेट घेण्यासाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालय, तुळजापूर जि.धाराशिव येथे 11.36 वा. रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच बिरादार असे माझ्याकडील मोटर सायकलवरुन तालुका कृषी अधिकारी कार्यालय, तुळजापूर जि.धाराशिव येथे जावुन तेथे मोटार सायकल बाजुला लावुन कार्यालयात जावुन देशमुख साहेब यांची भेट घेतली. त्यावेळी देशमुख साहेब व माझेत मस्टर संबंधाने बोलणे झाले. त्यादरम्यान देशमुख साहेब यांनी माझ्याकडे 300/-रु. लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना आध्यां तासांनी देतो असे म्हणालो व नंतर मी आणि पंच बिरादार असे त्यांचेपासुन निघुन माझेकडील मोटर सायकलने सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 12.00 वा. परत आलो.त्यानंतर पोना/शेवाळे यांनी माझ्या जवळील व्हाईस रेकॉर्डर काढुन, बंद करुन म्हेत्रे साहेबांकडे दिला. तेव्हा म्हेत्रे साहेब यांनी मला बाजुला जावुन थांबण्याची सुचना केल्याने मी तेथे बाजुला जावुन थांबलो. त्यानंतर काही वेळाने मला म्हेत्रे साहेब यांनी त्यांचेजवळ बोलावुन घेवुन हकीकत विचारली असता मी वरील प्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर त्यांचे सुचनेवरुन पोना/शेवाळे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामधील लाचमागणी संदर्भाने महत्वाचे संभाषण माझे व दोन्ही पंचासमक्ष ऐकले व संभाषणाबाबत मला व पंचांना विचारपुस केली. यावरुन माझे मुलाचे नावावरील शेतातील तुती रेशीम लागवडीचे मागील आठवडयाचे नमुना क्रमांक 4 वरुन ऑनलाईन ई मस्टर काढुन नंतर ते भरण्यासाठी देशमुख साहेब, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, तुळजापूर जि.धाराशिव यांनी माझेकडे 300/- रुपये लाचेची मागणी केली व सदरची लाच रक्कम लागलीच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून म्हेत्रे साहेब यांनी माझ्याशी, पंचाशी व सापळा पथक यांचेशी विचारविनिमय करुन देशमुख साहेब यांचेविरुध्द लाचेच्या सापळ्याचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी कळविले की, लाचेच्या नोटांना ॲन्थ्रासीन पावडर लावण्याची सापळापुर्व कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यानंतर त्यांच्या सुचनेवरुन मी माझ्याजवळील सर्व रोख रक्कम व चिज वस्तु काढुन त्यांचेसमोर खाजगी वाहनाचे सिटवर ठेवले. मग त्यांनी ॲन्थ्रासीन पावडर लावणे, ॲन्थ्रासीन पावडरचे उपयोग, गुणधर्म व ॲल्ट्राव्हायलेट दिव्याचा उपयोग याबाबत आम्हास माहिती दिली. त्यानंतर त्यांचे सुचनेवरुन पोकॉ/हजारे यांनी मी देशमुख साहेब यांना देण्यासाठी आणलेल्या 100/- रुपये दराच्या 03 चलनी नोटांना ॲन्थ्रासीन पावडर लावुन त्या नोटांची म्हेत्रे साहेब यांनी आणलेल्या खाजगी वाहनाच्या काचा व दरवाजे बंद करुन केलेल्या कृत्रीम अंधारात ॲल्ट्राव्हायोलेटच्या लॅम्पने तपासणी करुन त्याचे सविस्तर प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर सदर नोटांची घडी पोकॉ/हजारे यांनी माझे अंगावरील शर्टचे डाव्या बाजुचे खिशामध्ये अलगद ठेवुन दिली. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी देशमुख साहेब, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, तुळजापूर जि.धाराशिव यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर डोक्यावरील टोपी डाव्या हाताने काढुन घेणेबाबत ईशारा मला नेमुन दिला.त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला, दोन्ही पंचाना व सापळा पथकातील सदस्यांना सविस्तर सुचना दिल्या व नंतर त्यांच्या सुचनेवरुन पोना/शेवाळे यांनी एक नवीन मेमरी कार्ड व्हॉइस रेकॉर्डरमध्ये टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण रेकॉर्ड नसलेबाबत खात्री करुन दिली व त्यांनी माझे व देशमुख साहेब, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, तुळजापूर जि.धाराशिव यांचेत होणारे संभाषण व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्ड मध्ये रेकॉर्ड होणार असलेबाबत सांगितले. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला देशमुख साहेब, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, तुळजापूर जि.धाराशिव यांची भेट कोठे होईल? याबाबत विचारले असता मी त्यांना देशमुख साहेब हे तालुका कृषी अधिकारी कार्यालय, तुळजापूर जि.धाराशिव येथेच असुन तेथेच त्यांची भेट



Scanned with OKEN Scanner

होईल असे सांगीतले. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांचे सुचनेवरुन पोना/शेवाळे यांनी सदर व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टचे आतमध्ये असलेल्या बनियनला पीनने लावुन मी व पंच क्र. 1 बिरादार असे माझेकडील मोटार सायकल क्रमांक MH 03 P 4638 वर सापळा पथक थांबलेल्या ठिकाणावरुन देशमुख साहेब, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, तुळजापूर जि.धाराशिव यांची भेट घेण्यासाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालय, तुळजापूर जि.धाराशिव येथे 13.00 वा. रवाना झालो. आमचे पाठोपाठ म्हेत्रे साहेब व सापळा पथक असे त्यांचेकडील खाजगी वाहनाने निघाले. मी व पंच बिरादार असे माझ्याकडील मोटरसायकलवर तालुका कृषी अधिकारी कार्यालय, तुळजापूर जि. धाराशिव येथे जावुन तेथे मोटर सायकल बाजुला लावुन कार्यालयात जावुन देशमुख साहेब यांची भेट घेतली. त्यावेळी मी त्यांना 300/-रुपये आणलेत म्हणुन सांगितले असता, त्यांनी मला बरं..बरं असे म्हणुन पैसे देणेबाबत उजव्या हाताने इशारा केला. तेंव्हा मी माझ्या अंगावरील शर्टचे डाव्या खिशातील 300/- रुपये लाच रक्कम उजव्या हाताने काढुन त्यांचेसमोर धरली असता त्यांनी सदरची लाच रक्कम डाव्या हाताने स्विकारून ती त्यांचे अंगावरील पॅन्टचे समोरील डाव्या बाजुचे खिशामध्ये ठेवुन दिली. त्यानंतर देशमुख साहेब व माझेत काही वेळ बोलणे झाले व नंतर मी कार्यालयाचे बाहेर येवुन मला नेमुन दिलेला ईशारा केला ती वेळ साधारण 13.12 वाजण्याची होती. त्याचवेळी तेथे म्हेत्रे साहेब, पंच क्रमांक 2 पांचाळ आणि सापळा पथकातील पोलीस अंमलदार हजर आले व त्यांनी देशमुख साहेब, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, तुळजापूर जि.धाराशिव यांना ताब्यात घेतले. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांच्या सुचनेवरुन पोना/शेवाळे यांनी माझ्याजवळील व्हाईस रेकॉर्डर काढून घेवुन तो बंद केला व म्हेत्रे साहेब यांनी मला तेथे बाजुला जावुन थांबण्याची सुचना केली. त्यावरुन मी तेथे बाजुला जावुन थांबलो. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी तेथे पुढील कामकाज केले व नंतर काही वेळाने त्यांनी मला कार्यालयात बोलावुन घेतले व कार्यालयाचा दरवाजा, खिडक्या व इलेक्ट्रीक लाईट बंद करुन केलेल्या कृत्रीम अंधारात माझ्या हातांची व अंगावरील शॅटचे डाव्या बाजुच्या खिशाची अल्ट्राव्हायलेट लॅम्पव्दारे तपासणी केली असता माझे उजव्या हाताचे बोटाचे पेऱ्यावर व शॅटचे डाव्या बाजुचे खिशावर व आतील बाजुस ठिकठिकाणी ऍन्थ्रासीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर कार्यालयाचा दरवाजा व खिडक्या उघडुन इलेक्ट्रीक लाईट चालु करून उजेड केला. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी आम्हा सर्वासमक्ष देशमुख साहेब, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, तुळजापूर जि.धाराशिव यांना त्यांचे संपुर्ण नावाबाबत विचारपुस केली असता त्यांनी त्यांचे नाव अतुल शहाजी देशमुख, वय 37 वर्षे, पद-क्लर्क कम डाटा इंट्री ऑपरेटर, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, तुळजापूर जि.धाराशिव (कंत्राटी) मुळ रा. कात्री, ता.तुळजापूर जि. धाराशिव सध्याचा पत्ता- मराठी कन्या शाळेजवळ, शिक्षक कॉलनी, धाराशिव असे असल्याचे सांगितले. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी तेथील प्राथमिक कामकाज करुन मला लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव येथे येणेबाबत सांगितल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव येथे आलो. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव येथे म्हेत्रे साहेब यांनी दोन्ही पंचासमक्ष मला देशमुख साहेब, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, तुळजापूर जि.धाराशिव यांना पैसे देण्यासाठी रवाना केले पासुन ते ईशारा करेपर्यंत घटनाक्रम सांगावा अशी विचारणा केली असता, मी त्यांना वरील प्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर म्हेत्रे साहेब व पंचानी देशमुख साहेब यांचेत व माझेत व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले. एकंदरीत आज दिनांक 29.01.2025 रोजी अतुल शहाजी देशमुख, वय 37 वर्षे, पद- क्लर्क कम डाटा इंट्री ऑपरेटर, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, तुळजापूर जि.धाराशिव (कंत्राटी) मुळ रा. कात्री, ता.तुळजापूर जि.धाराशिव सध्याचा पत्ता- मराठी कन्या शाळेजवळ, शिक्षक कॉलनी, धाराशिव यांनी माझ्याकडे माझे मुलाचे नावावरील शेतातील तुती रेशीम लागवडीचे मागील आठवडयाचे नमुना क्रमांक 4 वरुन ऑनलाईन ई मस्टर काढुन नंतर ते भरण्यासाठी 300/- रुपये लाचेची मागणी करुन सदरची लाच रक्कम लागलीच स्विकारण्याचे मान्य केले व 300/- रुपये लाच रक्कम त्यांनी स्वत: स्विकारल्याने त्यांना पकडण्यात आले आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यासाठी मी माझी फिर्याद देत असुन सदरची फिर्याद लॅपटॉपवर टाईप करुन त्याची प्रिन्ट काढुन मला वाचण्यास दिली ती मी वाचुन पाहिली, ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.



Scanned with OKEN Scanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

RAVINDRA PANDURANG KHANDEKAR(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

दि. 31 वा पुरखुपकोळी

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): RAVINDRA PANDURA

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

पोलीस ठाणे,अमलदार
पोलीस स्टेशन,तुळजापूर



Scanned with OKEN Scanner